[illegible] :- [illegible]
कोड :- सी

!! सा विद्या या विमुक्तय !!

बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट, रुकडी संचलित,

NCTE CODE
APWO0546/113084



# छत्रपती शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय रुकडी



ता. हातकंणगले, जि. कोल्हापूर पिन - ४१६११८ फोन :- (०२३०) - २५८५८६०, ८९९९८७५५९३,
wbsite :- www. cscerukadi.in ९८९०३८१५१६,९८३४२११३५५
E-Mail :- csce04007rukadi@yahoo.co.in, csce04007rukadi@gmail.com
संस्थापक : कै.बाळासाहेब माने (एम.पी )

| अध्यक्षा | सचिव | प्राचार्य |
|---|---|---|
| श्रीम.डॉ.निवेदिता सं .माने ( माजी खासदार ) | खासदार श्री. धैर्यशील सं. माने | डॉ. श्रीम.भोसले ए.व्ही |

सी.ई.आर / ३७७/ २०२६ - २०२७ दिनांक.११ / ०८ / २०२६

प्रति,
मा.उपकुलसचिव,
संलग्नता टी २ विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

विषय :- महाविदयालयात विकास समिती सभेचा अहवाल सादर करणेबाबत...

महोदय,

छ.शिवाजी शिक्षणशास्त्र महाविदयाल, रुकडी येथे दि.११/०८/२०२६ मंगळवार रोजी सकाळी ठिक ११.३० वा. महाविद्यालय विकास समितीच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी महाविदयालय विकास समिती पदसिध्द अध्यक्ष, सचिव, परिसंस्था अध्यक्ष व इतर सर्व समिती सदस्य या सभेसाठी उपस्थित होते.

तरी सभेचा अहवाल सदर पत्रासोबत जोडत आहे त्याचा स्विकार व्हावा ही विनंती.

कळावे,

आपली विश्वासु,

Bhosale

(डॉ.भोसले ए.व्ही.)

प्राचार्य
छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय
रुकडी,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर

सोबत :-
१.अहवाल
२.साक्षंकित प्रती
३.सभा फोटो

Shinde
12/08/2026
For Registrar
Shivaji University,
Kolhapur

OK

Scanned with OKEN Scanner

मा. खास. डॉ. श्रीम
निवेदिता संभाजीराव
माने. (वहिनीसाहेब)

मा. डॉ. श्रीम. आरती विजय भोसले.

श्रीम. विशाखा विजय पाटील. 11.8.2026

श्रीम. छाया विवेक चव्हाण.

श्रीम. स्वाती राजाराम कांबळे.

श्री. बाळासो राम बनसोडे.

श्री. विजय ज्ञानदेव पाटील.

श्री. संदिप वसंत कांबळे.

श्री. राजेश विजय अपराध.

डॉ. श्री उत्तम रामचंद्र पाटील.

Scanned with OKEN Scanner

# महाविद्यालय विकास समिती अहवाल

## सन २०२५-२०२६

### दिनांक ११.०८.२०२६ मंगळवार

छ.शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये दिनांक ११.०८.२०२६ मंगळवार रोजी महाविद्यालय विकास समितीचे आयोजन करण्यात आले होते. सभेसाठी सर्व सदस्य उपस्थित होते व सभेपुढे पुढीलप्रमाणे विषय मंजुरीसाठी ठेवणेत आले.

मागील सभेचा आढावा : सर्व प्रथम मागील दिनांक २७.०३.२०२६ शुक्रवार रोजीच्या सभेचा वृत्तांत सविस्तरपणे वाचन करुन दिनांक ११.०८.२०२६ मंगळवार चा ठराव महाविदयालय विकास समिती परिसंस्थेच्या अध्यक्षा व महाविदयालयाच्या प्राचार्यां यांनी समितीमधील सर्व सदस्यासमोर ठराव सविस्तरपणे मांडला तो पुढीलप्रमाणे :

## अहवाल

ठराव क्रमांक १ : ०२ जून २०२६ रोजी संस्थेचे विश्वस्त कै.श्री.वसंतराव रावसाहेब घाटगे (सर्जेराव) यांचे वृदधापकाळाने निधन झाले ते संस्थेचे विश्वस्त होतेच पण संस्थेच्या अध्यक्षा यांचे पिताश्री ही होते. आपण सर्वांनी त्यांना श्रध्दांजली अर्पण करुया. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

सूचक : प्राचार्य डॉ.भोसले ए.व्ही.

अनुमोदक : सर्व समिती सदस्य

ठराव क्रमांक २ : ०४ ऑगस्ट २०२६ मंगळवार रोजी माजी राज्यपाल त्रिपुरा, बिहार, आसाम व डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. डॉ. डी. वाय. पाटील (दादा) यांचे वृध्दपकाळाने निधन झाले आपण सर्वांनी त्यांना श्रध्दांजली अर्पण करुया. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

सूचक : प्राचार्य डॉ.भोसले ए.व्ही.

अनुमोदक : सर्व समिती सदस्य

Scanned with OKEN Scanner

ठराव क्रमांक ३ : अभिनंदनाचा ठराव (बी.एड प्रशिक्षणार्थी)

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२६ मधील बी.एड मधील प्रशिक्षणार्थी विशेष प्राविण्य मिळवून यशस्वी झाले त्यांचा अभिनंदनाचा ठराव समिती समोर ठेवण्यात आला.

| अ.क्र. | प्रशिक्षणार्थी विद्यार्थी | एकुण गुण | टक्केवारी | श्रेणी | क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सीमा चंद्राकांत पेरनुले | २२०४/२४०० | ९१.८३ | A+ outstanding | प्रथम क्रमांक |
| २ | निलम सात्ताप्पा पाटील | २१७३/२४०० | ९०.५४ | A+ outstanding | द्वितीय क्रमांक |
| ३ | संतोष रामचंद्र कोळी | २१६३/२४०० | ९०.१३ | A+ outstanding | तृतीय क्रमांक |
| ४ | शामल संभाजी पाटील | २१५१/२४०० | ८९.५४ | A+ outstanding | चतुर्थ क्रमांक |
| ५ | ओंकार राजाराम तेली | २१३७/२४०० | ८९.०४ | A+ outstanding | पाचवा क्रमांक |

वरील ठराव सर्व सदस्यांनी एकमतानी मंजूर केला.

सूचक : प्राचार्य डॉ.भोसले ए.व्ही.

अनुमोदक : सहा.प्राध्यापक पाटील व्ही.व्ही.

ठराव क्रमांक ४ : प्राचार्य व प्राध्यापक यांची लवकरात लवकर जाहिरात शिवाजी विद्यापीठ कडून मंजूर करुन जाहिरात वृतपत्रामध्ये प्रसिध्द करावी. हा ठराव समिती समोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला.

हा ठराव सर्व समिती सदस्यांनी एकमताने मंजूर केला.

सूचक : प्राचार्य डॉ.भोसले ए.व्ही.

अनुमोदक : प्राचार्य डॉ.उत्तम पाटील

ठराव क्रमांक ५ : मोडी लिपीची कार्यशाळा आयोजित करणे व त्याचा certified कोर्स महाविदयालच्या वतीने सुरु करण्याचा प्रस्ताव समिती समोर ठेवण्यात आला व त्यास सुरु करण्यास परवानगी मिळावी.
हा ठराव सर्व समिती सदस्यां समोर मंजुरीसाठी ठेवण्यात आला.
हा ठराव सर्व सदस्यांनी एकमतानी मंजूर केला.

सूचक : प्राचार्य डॉ.भोसले ए.व्ही.

अनुमोदक : सहा.प्राध्यापक पाटील व्ही.व्ही.

Scanned with OKEN Scanner

ठराव क्रमांक ६ : शिवाजी विदयापीठाच्या सुचनेनुसार छ.शिवाजी शिक्षणशास्त्र महाविदयालयाचा Static I.D. काढून परिक्षा विभागाने सूचविल्या प्रमाणे Online पेपर तपासणी सुरु करण्यात येत आहे. हा ठराव समिती समोर मंजूरीसाठी ठेवण्यात आला.

हा ठराव सर्व सदस्यांनी व कार्यवाही प्रमाणे मंजुर केला.

सूचक : प्राचार्य डॉ.भोसले ए.व्ही.

अनुमोदक : श्री.बनसोडे बी.आर.

ठराव क्रमांक ७ : प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया CET CELL कडून रितसर विदयार्थी आल्यानंतर महाविदयालयात इच्छुक विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी महाविदयालयातील संबंधित घटकांनी व्यवस्थित पुर्ण करावी व त्याप्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी व त्यास मंजुरी मिळावी. हा ठराव समिती समोर मंजूरीसाठी ठेवण्यात आला.

प्रवेश प्रक्रियाचा हा ठराव सर्व सदस्यांनी एकमताने मंजूर केला.

सूचक : प्राचार्य डॉ.भोसले ए.व्ही.

अनुमोदक : श्री.बनसोडे बी.आर.

ठराव क्रमांक ८ : १८ फेब्रुवारी २०२६ ते १८ मे २०२६ या काळातील पारिजात त्रैमासिक अंकाचे दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजी संस्थेच्या अध्यक्षा व महाविद्यालय विकास समितीच्या पदसिध्द अध्यक्षा यांच्या हस्ते प्रकाशन करण्याचा ठराव समिती समोर ठेवला.

पारिजात त्रैमासिक अंकाचे प्रकाशन संस्थेच्या अध्यक्षा व परिसंस्थेच्या अध्यक्षा यांच्या हस्ते व सर्व समिती सदस्यांच्या उपस्थितीत घेण्यासाठी हा प्रस्ताव समितीने एकमताने मंजूर केला.

सूचक : प्राचार्य डॉ.भोसले ए.व्ही.

अनुमोदक : सहा.प्राध्यापक पाटील व्ही.व्ही.

ठराव क्रमांक ९ : " नो व्हेईकल डे " आपल्या बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्ट, रुकडी संचलित सर्व शाखेत महिन्याच्या कोणत्याही एका दिवशी आपल्या संस्थेतील सर्वांनीच इंधन वाहनांचा त्याग करावा. पर्यावरण संवर्धन व संरक्षण करावे व पर्यावरण संरक्षणास सर्वांनी हातभार लावावा. हा ठराव मंजूर करण्यासाठी सर्व समिती सदस्यांसमोर मांडण्यात आला.

वरील विषयास सर्व समिती सदस्यांनी एकमतानी मंजूरी दिली.

सूचक : प्राचार्य डॉ.भोसले ए.व्ही.

अनुमोदक : श्री.संदिप कांबळे

प्राचार्य
छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय
रुकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.

Scanned with OKEN Scanner





I-C प्राचार्य
छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय
रुकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner







I.C प्राचार्य
छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय
रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner